[stamp]

ISSN 0976-0377
RNI. MAHMUL02805/2010/33461

International Registered & Recognized
Research Journal Related To Higher Education for all Subjects

# INTERLINK RESEARCH ANALYSIS

(UGC Approved, Refereed & Peer Reviewed Research Journal)

Year -VIII, Issue - XIX, Vol.- I | Impact Factor 5.85 (GRIFI) | Jan. 2019 To June 2019

JANVIKAS MAHAVIDYALAYA, BANSAROLA AND
DR. BABASAHEB AMBEDKAR MARATHAWADA UNIVERSITY,
AURANGABAD

Sponsored

NATIONAL LEVEL CONFERENCE

ON

## "POLITICS OF DEVELOPMENT IN INDIA"




**Editor In Chief**
**Dr. Babasaheb M. Gore**

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani

RNI. MAHMUL02805/2010/33461 IMPACT FACTOR 3.42 ISSN 0976-0377
Interlink Research Analysis Issue : XV, Vol. II, Jan. 2017 To June 2017

# INDEX



| Sr. No | Title for Research Paper | Page No. |
|---|---|---|
| 1 | **Key Note Address**<br>Dr. B. R. Ambedkar Perspectives on Education and Empowerment in India<br>**Dr. Mahadev Gavhane** | 1 |
| 2 | Economic Thoughts of Dr. Babasaheb Ambedkar<br>**K. S. Kamble, Dr N. H. Bhise** | 6 |
| 3 | Non-governmental organizations and Development<br>**Dr. Ajay B. Patil** | 11 |
| 4 | Dr. B. R. Amedkars's perspectives on rural development in India<br>**Milind R. Ghate** | 15 |
| 5 | Environmental Sustainability : Research growth and Trends<br>**Balaji B. Waghmare, Raju B. Zore** | 21 |
| 6 | Politics for Economic Development in India<br>**Shaikh Gafoor Ahmed** | 28 |
| 7 | Politics for Rural Development in India<br>**Dr. Vandana M. Mahure** | 34 |
| 8 | Policies of Government for development<br>**Dr. Faruqui M. Quayyum** | 38 |
| 9 | NGOs and the Indian Development though five year plans<br>**Dr. T. N. Magar** | 44 |
| 10 | Dr. Ambedkar's Perception on Development<br>**Dr. Dattatraya V. Kharatmol** | 48 |
| 11 | भारतीय विकास में संचार माध्यमों की भूमिका<br>**डॉ. मुरलीधर अच्युतराव लहाडे** | 52 |
| 12 | चिरकालीन विकास आणि समस्या<br>**डॉ. गोपाळ शंकरराव भोसले** | 57 |
| 13 | वैश्वीकरण में राज्यके बदलते परिवेश<br>**डॉ. अमोल काळे** | 60 |
| 14 | जागतिकीकरणाचा परिणाम<br>**डॉ. ज्ञानेश्वर सोनवणे** | 64 |
| 15 | भारतातील आर्थिक विकास व प्रक्रियेतील घटक<br>**मिनाक्षी मधुकर उबाळे** | 67 |

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani


| Sr. No | Title for Research Paper | Page No. |
|---|---|---|
| 16 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर :सुरक्षात्मक दृष्टीकोन व विकास<br>**डॉ. किरण चक्रे** | 72 |
| 17 | जागतिक तापमान वाढीचे परिणाम व उपाय योजना<br>**डॉ. हरिदास जी. पिसाळ** | 76 |
| 18 | जागतिकीकरणाचा राज्यावर झालेला परिणाम<br>**डॉ. एस.आर. कदम** | 81 |
| 19 | जागतिकीकरणाचा भारतीय कृषी क्षेत्रावर झालेला परिणाम<br>**डॉ. संगीता दत्ताजी मोरे** | 85 |
| 20 | शाश्वत विकास<br>**साईनाथ इस्तारी वाघमारे** | 89 |
| 21 | जागतिकीकरणाचा शेती व शेतकऱ्यावर झालेला परिणाम - एक अभ्यास<br>**डॉ. विलास आघाव** | 93 |
| 22 | जागतिकीकरण आणि भारतीय शेती विकासातील अडथळे<br>**डॉ. उमाकांत ज्ञानोबा वानखेडे** | 97 |
| 23 | हिंद-स्वराज आणि शाश्वत विकास<br>**डॉ. शैलजा बरुरे** | 101 |
| 24 | भारतातील ग्रामीण विकास आणि राजकिय दृष्टिकोणाचा राजकिय अभ्यास<br>**डॉ. तुकाराम दत्तात्रय गोंदकर** | 105 |
| 25 | राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टिकोनातून "अन्न सुरक्षा"<br>**महेशकुमार भगवानराव चौरे** | 109 |
| 26 | भारतीय लोकशाही आणि विकास<br>**डॉ. राम प्र. ताटे, डॉ. रमेश के. माने** | 113 |
| 27 | महाराष्ट्रातील विकासाचे राजकारण : एक विश्लेषणात्मक अध्ययन<br>**डॉ. अनिल दत्तू देशमुख** | 116 |
| 28 | भारतीय राजकीय पक्ष व त्यांची ध्येय धोरणे<br>**बिजयसिंग भावरदोडे** | 123 |
| 29 | जागतिकीकरण - भारतीय संदर्भ<br>**डॉ.माधव चोले** | 128 |
| 30 | महिला राजकारण : मराठवाडयाच्या ग्रामिण विकासातील सहभागाचा राजकिय अभ्यास<br>**डॉ. चंद्रशेखर काशिनाथ तळेकर** | 134 |
| 31 | चिरकालीन विकासाचा अर्थ, आवश्यकता आणि घटक<br>**डॉ.नामानंद गौतम साठे** | 138 |

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani



| Sr. No | Title for Research Paper | Page No. |
|---|---|---|
| 32 | महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ : एक अवलोकन<br>**धर्मराज केशवराव कटके** | 141 |
| 33 | शाश्वत किंवा चिरंतन विकास<br>**डॉ. केशव दत्तराव तिडके** | 147 |
| 34 | जागतिकीकरणाचा भारतीय समाजावर झालेला परिणाम<br>**डॉ.गितांजली सदाशिवराव मोटे** | 150 |
| 35 | अन्न सुरक्षा धोरण व आव्हाणे<br>**जयंत हंसराज मोरे** | 154 |
| 36 | सामाजिक, राजकीय, आर्थिक परिवर्तनाचे महामेरु - डॉ.बाबासाहेब आंबेडकर<br>**डॉ. सुधाकर एस. हांगे** | 158 |
| 37 | अन्न सुरक्षा<br>**डॉ. मुक्ता सोमवंशी (गंगणे)** | 161 |
| 38 | जागतिकीकरणाचा आर्थिक विकासावर झालेला परिणाम<br>**शितल शामसुदर शिंदे** | 166 |
| 39 | जागतिकीकरणाचा शेतीक्षेत्रावर झालेला परिणाम - एक अभ्यास<br>**डॉ. सुखनंदन ढोले** | 170 |
| 40 | महाराष्ट्रातील उद्योजकता विकासातील राजकिय धोरण<br>**बाबुराव रामभाऊ मुंडे** | 175 |
| 41 | भारतातील राज्यशास्त्राचा विकास<br>**अशोक ज्ञानोबा दुनघव** | 178 |
| 42 | मानवाधिकार आणि भारतीय संविधान<br>**डॉ. सुहास मोराळे, महेश कांबळे** | 180 |
| 43 | जागतिकीकरण आणि भारतावरील परिणाम<br>**डॉ. दयानंद माधवराव गुडेवार** | 184 |
| 44 | जागतिकीकरण आणि मराठी नाटक<br>**डॉ. संपदा कुलकर्णी** | 187 |

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani



# अन्न सुरक्षा

**डॉ. मुक्ता सोमवंशी (गंगणे)**
लोकप्रशासन विभाग प्रमुख,
कै. रमेश वरपूडकर महाविद्यालय,
सोनपेठ, जि. परभणी

37 **Research Paper - P. A.**

भारत हा विकसनशील राष्ट्रांच्या यादीत समाविष्ट असलेला देश असून स्वातंत्र्य प्राप्तीनंतर विविध समस्यांना सामोरे जात विविध क्षेत्रात विकास घडवून आणण्यात यशस्वी झाला आहे. परंतु काही मूलभूत गरजांची पूर्तता मात्र अद्यापही झाली आहे, असे म्हणता येत नाही. विशेषतः ग्रामीण भागाचा विकास, ग्रामीण भागातील पायाभूत सुविधा आजही पूर्ण करू शकलो नाहीत. एकीकडे आम्ही तंत्रज्ञान विज्ञानामध्ये प्रगती केली आहे. डिजिटल इंडियाचे स्वप्न पहात आहोत. परंतु मानवाच्या अत्यावश्यक गरजांची पूर्तता मात्र झालेली नाही. आजही आमच्या देशातील अनेक आरोग्य केंद्र शोभेच्या वास्तु ठरत आहेत. तेथे योग्य तो उपचार उपलब्ध होत नाही. यामुळे सामान्य व्यक्तीला अनेक संकटांना सामोरे जावे लागते.आम्ही आमचा भारत डिजिटल इंडिया झाला पाहिजे असा आग्रह धरतो. परंतु या देशातील प्रत्येक व्यक्तीला रोजगार मिळेल, याचा विचार केला जात नाही. आज देशात सुशिक्षित बेरोजगारांची संख्या अफाट आहे, तर दुसऱ्या बाजूला कुशल मनुष्यबळा अभावी अनेक जागा रिक्त असल्याचे बोलले जाते. अशी परिस्थिती भारताची आहे. जेव्हा व्यक्तीला उदरनिर्वाह करण्यासाठी हाताला काम मिळत नसेल, तर तो आपली उपजिवीका कशी करणार? यातूनच अन्नसुरक्षेचा प्रश्न उद्भवतो प्रत्येक व्यक्तीला जीवन जगण्यासाठी अन्नाची आवश्यकता असते. परंतु व्यक्ती आपल्या गरजा तेव्हाच पूर्ण करु शकतो, जेव्हा त्याला एखादा सुरक्षित व्यवसाय अथवा काम मिळते.

**संशोधन पद्धती :-**

तथ्य संकलन :-

प्रस्तुत शोधनिबंध घेण्यासाठी दुय्यक साधनसामग्रीचा वापर करण्यात आला आहे. त्यामध्ये काही संदर्भ ग्रंथ, मासिक, वृत्तपत्र व इंटरनेटचा समावेश आहे.

**उद्देश :-**

१) अन्न सुरक्षा विधेयकावर प्रकाश टाकणे.

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani

RNI. MAHMUL02805/2010/33461
Interlink Research Analysis
IMPACT FACTOR 5.85
ISSN 0976-0377
Issue : XIX, Vol. I, Jan. 2019 To June 2019 

२) अन्न सुरक्षा विधेयकाची व्याप्ती स्पष्ट करणे.

३) अन्न सुरक्षा विधेयकाची आवश्यता स्पष्ट करणे.

४) अन्न सुरक्षा विधेयकाच्या अंमलबजावणीचा अभ्यास करणे.

**गृहीतकृत्य :-**

'पोषक आहारा अभावी व्यक्तीच्या सर्वांगीण विकासात बाधा निर्माण होते.'

अन्न सुरक्षेचा अर्थ :- संयुक्त राष्ट्राच्या अन्न व कृषी संघटनेने सुरक्षेची व्याख्या अशी केली आहे, "सक्रिय व आरोग्यसंपन्न जीवन जगण्यासाठी सर्व माणसांना, सर्वकाळ त्यांच्या आहाराची गरज व अन्नपदार्थाचा प्राधान्यक्रम यांची पूर्तता करणारे पुरेसे, सुरक्षित व पौष्टिक अन्न मिळयणे म्हणजे अन्न सुरक्षा होय. १"

भारतामध्ये अन्न सुरक्षा हा गंभीर प्रश्न बनला आहे. अन्न सुरक्षा अभावी भारतातील ८०% लोकांना पुरेसे अन्न मिळत नाही. तर जागतिक भूक निर्देशांक या ११९ देशांच्या यादीत भारताचा क्रमांक ९४ वा आहे, दर तीन पैकी एक भारतीय व्यक्ती कमी वजनाची असून ५०% स्त्रिया कुपोषित किंवा रक्तशयाने बाधित आहेत. अन्न सुरक्षा अभावी कुपोषण, भूकबळी, रक्तशय अशा समस्या निर्माण झाल्या आहेत. तसेच अन्न सुरक्षा अभावी बालमजुरीला प्रतिबंध घालणे कठीण होत आहे. भारतामध्ये बालमृत्यूचे प्रमाण प्रतिहजारी १२० आहे. १३० देशांच्या सूचीमध्ये भारताला सत्ताविसाव्या ठिकाणी ठेवते. भारतामध्ये दोन करोड पेक्षा अधिक बालक बालकामगार म्हणून काम करत आहेत. या बालकामगारांचे मोठ्या प्रमाणात शोषण होते.

**अन्न सुरक्षा धोरण :-**

१९९६ मध्ये जागतिक अन्न परिषदेने पोषक अन्नाचा अधिकाराचा औपचारिकपणे स्वीकार केला होता. भारतीय घटनेच्या कलम २१ मध्ये प्रत्येक भारतीयाला अन्नाचा अधिकार देण्यात आला आहे. तसेच घटना कलम ४७ मध्ये मार्गदर्शक तत्वामध्ये नमूद करण्यात आले आहे की, राज्याने आपल्या जनतेच्या पोषणाचा स्तर आणि जीवनमानाच्या स्तरांमध्ये सुधारणा व वाढ करण्यास प्रयत्न करावेत. तसेच सर्वसामान्यांचे स्वास्थ्य चांगले राहण्यासाठी प्राथमिकतेने कार्य करावे. १९७४ मध्ये जागतिक अन्न परिषदेत अन्न सुरक्षा संकल्पना विषद करण्यात आली. प्रत्येक व्यक्तीला पोषक आहार मिळायला हवा या उद्देशाने अन्न सुरक्षा ही संकल्पना मांडण्यात आली आहे.

भारतामध्ये १९९७ मध्ये एक योजना आखण्यात आली. या योजने मधून देशातील विविध राज्यात स्थापन करण्यात आलेल्या रेशन दुकानांच्या माध्यमातून गहू, तांदूळ, साखर, तेल अशा अन्नधान्याचे वाटप केले जात असे. अन्न सुरक्षा विधेयक २०१३ नुसार भारताच्या एकूण लोकसंख्येच्या ६७% जनतेला या योजनेत लाभ मिळणार होता. त्यामध्ये ७५% ग्रामीण भागातील जनता तर ५०% शहरी भागातील जनतेचा समावेश होता. या योजने अंतर्गत प्रत्येक व्यक्तीला दर महिन्याला पाच

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani



किलो धान्य मिळेल. त्यामध्ये तांदूळ तीन रू. किलो गहू दोन रूपये किलो तर डाळ एक रूपये किलो इतक्या कमी दराने देण्याचे नमूद करण्यात आले. अंत्योदय योजने अंतर्गत गरीब कुटूंबांना ३५ किलो धान्य देण्याची तरतूद करण्यात आली. गर्भवती महिलेला सहा हजार रूपये अतिरिक्त मिळतील व १४ वर्षाखालील प्रत्येक मुलाला शिजवलेले अन्न मिळेल. अशी या विधेयकात तरतूद करण्यात आली. या योजनेच्या अंमलबजावणीसाठी दरवर्षी ६१२ लाख ३० हजार टन धान्याची गरज आहे तसेच या योजनेसाठी लागणारा खर्च एक लाख २४ हजार ७२४ कोटी एवढा आहे. देशातील जवळपास ८१ कोटी जनतेस या कायद्यामुळे सवलतीच्या दरात धान्य मिळते. तर राज्यातील ११.१३ कोटी जनतेपैकी सात कोटी जनतेला या योजनेअंतर्गत धान्य मिळते. या अन्न सुरक्षा धोरणाचा फायदा अशा कुटुंबाना दिला जातो की, शहरी भागासाठी ज्या कुटुंबाचे उत्पन्न १५००० ते ५९००० व ग्रामीण भागासाठी १५००० ते ४४००० या प्रमाणात आहे.

भारत सरकार द्वारा वर्ष २०१६-१७ मध्ये राज्य सरकारांना दर महिन्याला ११७२६ कोटी रूपये प्रतिमहिना याप्रमाणे तर वर्षा । जवळपास १४०७०० कोटी रूपये सबसिडी आहे. लाभार्थीच्या बँक खात्यात अन्नपदार्थाची सबसिडी रोख स्वरूपात हस्तांतरित केली जात आहे. लाभार्थी आपल्या पसंतीनुसार बाजारामधून धान्य खरेदी करू शकतात.

**अन्न सुरक्षा धोरणाची वैशिष्टये :-**

१. सार्वजनिक वितरण व्यवस्था अधिक प्रभावी :- अन्न सुरक्षा योजनेत धान्याचे वितरण ही सर्वात मोठी जबाबदारी होती. तेव्हा ही जबाबदारी व्यवस्थितपणे पार पाडण्यासाठी सार्वजनिक वितरण व्यवस्था अधिक प्रभावी करण्यावर भर देण्यात आला. तसेच सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील त्रुटी दूर करुन या व्यवस्थेचा विस्तार करण्यात आला व लाभार्थींना मिळणारा लाभ वेळेत मिळेल यावर भर देण्यात आला.

२. अन्न सुरक्षा धोरणाची व्याप्ती :- अन्न सुरक्षा धोरणाची व्याप्ती अधिक असून या अंतर्गत असणारे लाभार्थी इतर कोणत्याही योजनेपेक्षा अधिक प्रमाणात आहेत.

३. जीवनस्तर उंचावणे :- अन्न सुरक्षा धोरणा अंतर्गत अतिसामान्य आर्थिक स्थिती असणाज्या नागरिकांचा जीवन स्तर उंचावण्याची निश्चित करण्यात आले.

४. पारदर्शकता :- अन्न सुरक्षा धोरणाची अंमलबजावणी करत असताना पारदर्शकता आली सर्व लाभार्थीची संगणकाच्या माध्यमातून नोंदणी करून त्यास आधार लिंक करण्यात आले, यामुळे अपात्र लाभार्थींना पायबंद घालण्यात आला.

५. महिला बचत गटांना प्राधान्य :- अन्न सुरक्षा योजनेमध्ये वितरण व्यवस्थेत महिला बचत गटांचा समावेश करण्यात आला. यामुळे अयोग्य बाबींना थारा मिळणार नाही अशी अपेक्षा आहे.

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani



६. कुपोषणावर मात :- अन्न सुरक्षा धोरणातून पोषण आहाराची सातत्यपूर्ण हमी देऊन कुपोषणावर मात करण्याचे निश्चित करण्यात आले.

उपरोक्त वैशिष्ट्यांवरून अन्न सुरक्षा धोरण एक विस्तृत व अभिनव धोरण असल्याचे स्पष्ट होते. या धोरणाची स्वीकृती अनेक राज्यांनी केली. यामध्ये महाराष्ट्र अग्रेसर आहे. निश्चितच अन्न सुरक्षा धोरण स्वीकारल्यामुळे गरिबी आणि उपासमारी यावर नियंत्रण आणण्यात प्रशासन यशस्वी ठरेल अशी अपेक्षा आहे. महाराष्ट्र शासनाने अन्न सुरक्षा धोरण व्यापक स्वरूपात राबवून दारिद्रय व कुपोषण हद्दपार करण्याचे निश्चित केले. हे धोरण राबविणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे. राज्यातील एकूण ११ कोटी जनतेपैकी सात कोटी जनतेला या योजने अंतर्गत हक्काचे धान्य मिळण्यास मदत झाली आहे.

**अन्न सुरक्षा धोरणाची अमलबजावणी व नियंत्रण :-**

अन्न सुरक्षा धोरणाची योग्य पद्धतीने अंमलबजावणी करण्याच्या हेतूने प्रत्येक जिल्ह्यात जिल्हाधिकारी यांना जिल्हा तक्रार निवारण अधिकारी म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. राज्यस्तरावर पाच सदस्य राज्य अन्न आयोगाची स्थापना करण्यात आली आहे. राष्ट्रीय अन्नसुरक्षा कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी उपायोजना करणे. तसेच जिल्हा तक्रार निवारण अकिारी अपिलाची सुनावणी घेऊन योग्य निर्णय घेणे. इत्यादी कामे या आयोगामार्फत करण्यात येतात. या कायद्याची अंमलबजावणी करताना कोणी अधिकारी दोषी आढळल्यास पाच हजार रूपये दंड आकारण्याची तरतूद या कायद्यात करण्यात आली आहे. असे असले तरी राज्यात रेशन दुकानांच्या माध्यमातून अनेक घटना घडताना दिसून येतात. उदाहरणार्थ लाभार्थ्यांसाठी आलेले धान्य साधारण मार्केटमध्यये उपलब्ध करून दिले जाते व वितरण करणाज्या व्यक्ती जे धान्य तीन रूपये किलोनी अन्न ुरक्षा अंतर्गत वितरित केले जाणार आहे ते धान्य काळ्या बाजारात वीस रूपये किलोने विकले जाते. प्रत्यक्ष लाभार्थी व्यक्तींना मात्र धान्य उपलब्ध नसल्याचे सांगून त्यांच्या हक्कापासून त्यांना वंचित ठेवल्या जाते. तसेच पात्र असतानाही या योजनेचा अनेकांना लाभ मिळालेला नाही. तर अपात्र असतानाही अनेक जण याचा लाभ घेत असल्याच्या तक्रारी आहेत. एकंदरीत कोणतेही धोरण तयार करीत असताना त्याचा शुध्द आणि प्रामाणिक हेतू असतो, परंतु अंमलबजावणीमध्ये अनेक दोष निर्माण होतात. तेव्हा असे दोष अन्न सुधारणा धोरणाची अंमलबजावणी करताना झालेले दिसून येतात.

**निष्कर्ष :-**

१. सन २०१३ च्या अन्न सुरक्षा धोरणा अंतर्गत देशातील बहुसंख्य लोकांना अन्न सुरक्षा प्रदान करण्यात आली.

२. ज्या व्यक्तींना बाजारातून धान्य खरेदी करावयाचे असेल त्यांच्या खात्यावर सबसिडी जमा करण्यात येते.

RNI. MAHMUL02805/2010/33461
Interlink Research Analysis
IMPACT FACTOR 5.85
ISSN 0976-0377
Issue : XIX, Vol. I, Jan. 2019 To June 2019 

३. या धोरणानुसार १४ वर्षाखालील मुलांना शालेय पोषण आहार अंतर्गत शाळेत मध्यंतरी पोषण आहार सुरू करण्यात आला.

**समारोप :-**

राष्ट्रीय अन्न सुरक्षा धोरणाअंतर्गत देशातील बुसंख्य लोकांना अन्न सुरक्षा प्रदान करण्यात आली. परंतु यामध्ये काही प्रमाणात उणिावा जाणवतात कारण काही गरजू व्यक्तींना या योजनेपासून वंचित राहावे लागले. त्यांच्याकडे आधार कार्ड उपलब्ध नव्हते. तसेच महा-ई-सेवा केंद्राच्या माध्यमातून अनेक लोकांना आपल्या ऑनलाईन माहिती सादर करताना अडचणींचा सामना करावा लागला. अन्नसुरक्षा अंतर्गत देण्यात येणारे धान्य, त्याचा दर्जा हे पाहिले जात नाही. अनेकदा या योजनेअंतर्गत मिळालेली डाळ सिजली जात नाही, अशा तक्रारी लाभार्थ्यांकडून येतात. देशातील जनतेला अन्न सुरक्षा प्रदान करत असताना प्रामुख्याने त्यांना उत्तम रोजगाराच्या व व्यवसायाच्या संधी उपलब्ध करुन देण्यावर भर देणे आवश्यक आहे. केवळ अन्न सुरक्षा प्रदान करुन नागरिकांचा जीवन स्तर उंचावण्यास मदत होईल असे म्हणता येत नाही.

## संदर्भ सूची :-

१. महाराष्ट्र वार्षिकी २०१२ -संपादक तुकाराम जाधव
२. डॉ. सतीश ठोंबरे व डॉ. सुधीर दिंडे-सार्वजनिक धोरण आणि विकास, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद २०१५
३. डॉ. राजशेखर सोलापूर-मानवी हक्क आणि समाज, अरूणा प्रकाशन, लातूर, २०१४.

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani